संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
11 APR 2018
प्राप्त झाले सही.........

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील श्री. के. ना. कुटे यांना सहायक संचालक संवर्गातील पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश, क्र:- संलेको २०१४/प्र.क्र.०७/कोषा प्रशा-२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ९ एप्रिल, २०१८.

संदर्भ:- १. वित्त विभाग, शासन आदेश, क्र. संलेको २०१४/ प्र.क्र.१६८/ कोषा प्रशा- २, दि. २८/८/२०१७

२. संचालनालयाचे आदेश क्र. संलेको १२.२०१६/ प्रशा राप/ का- १/आप्रयो/ १४४४, दि. २२ डिसेंबर, २०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- अ (कनिष्ठ) सहायक संचालक संवर्गात पदोन्नती देण्याकरीता दि. १०/०६/२००२ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय समितीच्या बैठकीमध्ये श्री. के. ना. कुटे यांच्या नावाचा विचार करण्यात आला होता. मात्र तेव्हा श्री. कुटे हे लाचलूचपत प्रतिबंधक पथकाच्या कारवाई मध्ये निलंबित असल्याने (दि. १९/८/१९९९ ते दि. ३/९/२००७) व त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयामध्ये अभियोग दाखल असल्याने पदोन्नती समितीने त्यांचा पदोन्नतीसाठी विचार केला नाही.

सदर सन २००२ च्या निवडसुचीतून श्री. कुटे (ज्ये.क्र. ६१३) यांना सेवाकनिष्ठ असलेले श्री. गौ. ल. जगदाळे (ज्ये.क्र. ६१६) यांना दि. २३/१०/२००३ च्या शासन आदेशान्वये सहायक संचालक संवर्गातील पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती.

तद्‌नंतर श्री. कुटे यांच्या विरुध्दच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये त्यांना निर्दोष मुक्त करण्यात आली. तसेच, सदर प्रकरणी विभागीय चौकशी मध्ये झालेल्या शिक्षेच्या आदेशाविरुध्द अपीलामध्ये त्यांना दोषमुक्त केले आहे. त्यानंतर श्री. कुटे यांना दि. २९/५/२०१३ च्या आदेशान्वये, सहायक संचालक संवर्गामध्ये तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन २००१-०२, २००२-०३ व २००३-०४ या निवडसुची वर्षामध्ये देण्यात आलेल्या नियमीत / तदर्थ पदोन्नत्या सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये नियमीत करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सन २००२-०३ या वर्षातील १५ पदांच्या सुधारीत निवडसुचीमध्ये श्री. के. ना. कुटे यांचा अ. क्र. ११ येथे समावेश करण्यात आला व त्यांचे प्रकरण खुले ठेवण्यात आले आहे. तसेच श्री. के. ना. कुटे (ज्ये.क्र. ६१३) यांना सेवाकनिष्ठ असलेले श्री. गौ. ल. जगदाळे (ज्ये.क्र. ६१६) यांना सहायक संचालक संवर्गातील दि. १/८/२००३ हा नियमित पदोन्नतीचा दिनांक देण्यात आला आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर श्री. के. ना. कुटे (ज्ये.क्र. ६१३) यांना श्री. गौ. ल. जगदाळे (ज्ये.क्र. ६१६) यांच्या सहाय्यक संचालक संवर्गातील नियमित पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन आदेश :-

श्री. के. ना. कुटे (ज्ये.क्र. ६१३) यांना सहायक संचालक या पदाचा मानीव दिनांक मंजूर करण्याच्या अनुषंगाने त्यांची सन २००२ च्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील पात्रता चक्राकार पध्दतीने तपासण्यात आली असून त्यांना पात्र ठरविण्यात आले.

सदर विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनुसार तयार करण्यात आलेल्या सन २००२ च्या सुधारीत निवडसुचीत श्री. के. ना. कुटे अ.क्र. ११ यांच्या नंतर श्री. गौ. ल. जगदाळे यांचा अ.क्र. १२ येथे समावेश करण्यात आला असून त्यांना संदर्भाधीन आदेशान्वये दि. १/८/२००३ हा नियमीत पदोन्नतीचा दिनांक देण्यात आला आहे.

सन २००२-०३ च्या सुधारीत निवडसुचीत श्री. कुटे यांचे प्रकरण खुले ठेवण्यात आले असल्याने त्यांना या निवडसुचीतील त्यांच्या लगतच्या खालच्या क्रमांकावर असलेले श्री. गौ. ल. जगदाळे यांचा नियमीत पदोन्नतीचा दि. १/८/२००३ हा दिनांक प्रदान केल्यास उक्त निवडसुचीच्या आकारमानात बदल होत नाही. त्यामुळे श्री. श्री. कुटे यांना श्री. गौ. ल. जगदाळे यांच्या नियमीत पदोन्नतीचा दि. १/८/२००३ हा मानीव दिनांक देण्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. श्री. के. ना. कुटे यांना संदर्भ क्र. २ येथील दि. २२ डिसेंबर, २०१६ च्या आदेशान्वये आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ दि. १/८/२००१ पासून व दुसरा लाभ दि. १/८/२०१३ पासून मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना मानीव दिनांकाच्या (दि. १/८/२००३) पुर्वीपासूनच सहायक संचालक संवर्गाची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांच्या वेतनिश्चितीचीबाबत आवश्यक ती कार्यवाही संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी करावी.

३. प्रस्तुतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७५ /१८, साप्रवि /१२, दिनांक १६/२/२०१८ अन्वये, दिलेल्या सहमतीने तसेच सेवा- ३ कार्यासनाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ११८/१८, सेवा- ३, दि. १५/३/२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gandhi

**(मा. रा. गांधी)**
**अवर सचिव, वित्त विभाग**

प्रति -

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा ) १/२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.*

४) सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, नाशिक.*
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे महानगरपालिका, धुळे. *
६) संबंधित अधिकारी.
७) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन- १२.
८) निवडनस्ती, (कोषा.प्रशा - २)

(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत) *